RNI MAHMAR
36829-2010


ISSN - 2229-4929

Peer Reviewed

# Akshar Wangmay

International Research Journal

UGC-CARE LISTED



## RETHINKING MAHATMA GANDHI IN PRESENT CONTEXT

February 2020

Executive Editor : Dr. Kiran Save

Co-Editor : Dr. Tanaji Pol
Prof. Anagha Padhye Deshmukh

Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi

# AKSHAR WANGMAY

International Peer Reviewed Journal
UGC CARE LISTED JOURNAL

February – 2020

## Rethinking Mahatma Gandhi in Present Context

**Executive Editor**
Dr. Kiran Save
Principal
Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce & M.H. Mehta Science College Palghar Dist. Palghar [M.S.] India

**Co-Editors**
Dr. Tanaji Pol
Asst. Prof. Anagha Padhye Deshmukh

**Chief Editor**
Dr. Nanasaheb Suryawanshi
Pratik Prakashan, Pranav, Rukmenagar, Thodga Road Ahmedpur
Dist. Latur- 433515, Maharashtra

Published by – Dr. Kiran Save, Principal,Sonopant Dandekar Arts, V.S. Apte Commerce & M.H. Mehta Science College Palghar

The Editor shall not be responsible for originally and thought expressed in the papers. The authors shall be solely held responsible for the originally and thoughts expressed in their papers.

© all rights reserved with the Editors

'Akshar Wangmay' UGC Approved & Peer Reviewed International Research Journal
ISSN : 2229-4929
RNI: MAHMAR 36829-2010
Rethinking Mahatma Gandhi in Present Context
February – 2020

# Index


| अ.क्र. | पेपरचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ट क्र. |
|---|---|---|---|
| १ | महात्मा गांधीजींच्या धर्मविषयक विचारांची प्रस्तुतता | श्री. संतोष बुधाजी भावार्थे | १.५ |
| २ | प्रचलित संदर्भात गांधी विचारांचे महत्व | डॉ. किरण जयदेव सावे | ६.११ |
| ३ | गांधीजी आणि श्रीमद्भगवद्गीता | डॉ. सचिन खोकले | १२.१४ |
| ४ | अहिंसातत्वज्ञानाचा इतिहास : एक चिकित्सक अभ्यास | प्रा. विनोद संभाजी सोनवणे | १५.२१ |
| ५ | आज गरज महात्मा गांधीजीच्या अर्थकारणाची | डॉ. हनुमंत कुरकुटे | २२.२८ |
| ६ | महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांची समर्पकता | प्रा. धनेश मधुकर हरड | २९.३४ |
| ७ | कृषी विकासात महात्मा गांधीजीच्या विचारांचे योगदान | प्रा. कांतीलाल शंकर पाटील | ३५.३९ |
| ८ | महात्मा गांधी यांच्या सर्वधर्मसमभाव विचारांची प्रांसंगिकता | डॉ. माधव नरहरी कांबळे | ४०.४४ |
| ९ | महात्मा गांधी आदर्श ग्राम संकल्पना | प्रा.प्रकाश विष्णू घरत | ४५.४८ |
| १० | २१ व्या शतकात महात्मा गांधीजीच्या 'सत्याग्रह' तत्वज्ञानाचे महत्व | प्रा. प्रेरणा राऊत | ४९.५२ |
| ११ | गांधी आंबेडकर महासमन्वय : काळाची गरज | डॉ. राहुल हांडें | ५३.५६ |
| १२ | गांधीजींचे स्त्री विचार | प्रा. रामदास येडे | ५७.५९ |
| १३ | महात्मा गांधीजीच्या अहिंसा तत्वाचा प्रभाव | प्रा. रोहीत गायकवाड | ६०.६३ |
| १४ | महात्मा गांधीजीच्या विचारांचा शिक्षणमहर्षी कर्मवीर भाउराव पाटील यांच्या कार्यावर पडलेला प्रभाव: एक चिंतन | प्रा. सुनीलदत्त गोडसे | ६४.६६ |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | महात्मा गांधीजीची आदर्श ग्रामाची संकल्पना | डॉ. प्रमोद रामेश्वर चव्हाण | ६७.६९ |
| १६ | गांधीवादाचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ. नाना झगडे, | ७०.८१ |
| १७ | 'सद्य परिस्थितीत महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता' | प्रा. डॉ. वसंत आबासाहेब खरात, | ८२.८७ |
| १८ | महात्मा गांधीजींच्या स्वराज्य संकल्पनेचे एक साधन–सहकार मार्गदर्शक | डॉ. अनिल पाटील<br>योगिनी जयवंत पाटील | ८८.९३ |
| १९ | ''सिनेमा आणि गांधी'' | शशिकांत एस माघाडे | ९४.९९ |
| २० | सिनेमातील गांधी | प्रा. सुजाता बळवंत शिरोडे | १००.१०४ |
| २१ | 'मराठी साहित्यातील गांधीवाद' | प्रा. यादव धोंडूजी मोरे | १०५.१०९ |
| २२ | महात्मा गांधीजींची सत्याग्रह संकल्पना | प्रा. वितेश भारत निकते | ११०.११२ |
| २३ | महात्मा गांधीजींचे ग्रामीण विकासासंबंधीचे विचार | प्रा. डॉ. जे. के. पाटील | ११३.११९ |
| २४ | ''गांधीजीके ट्रस्टीशिप सिद्धांत का अन्वयार्थ'' | श्री. अमन बगाडे | १२०.१२४ |
| २५ | महात्मा गांधीजीकी स्वदेशी विचारधारा | प्रा. दिप्ती हरेश म्हात्रे | १२५.१२७ |
| २६ | २१वीं सदी में गांधीवाद की उपयोगिता | डॉ. संगीता ठाकुर | १२८.१३१ |
| २७ | महात्मा गांधी – राष्ट्रीय नेता | प्रा. डॉ. शेडगे विजय सोपानराव | १३२.१३७ |
| २८ | ग्रामगीता व गांधीविचार | डॉ. शर्मिला वीरकर | १३८.१४५ |
| २९ | महात्मा गांधी यांचे अस्पृश्यताविषयक विचार | डॉ. सखाराम डाखोरे | १४६.१५२ |
| ३० | महात्मा गांधी आणि धर्म | डॉ. विन्सेन्ट कैतान डिमेलो | १५३.१६२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | नाशिक शहरातील मॅनेजमेन्टच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून महात्मा गांधींच्या शिक्षणाबद्दलच्या विचारांची कालानुरूपता | डॉ. स्मिता कचोळे | १६३.१७२ |
| ३२ | महात्मा गांधी की आदर्श ग्राम संकल्पना | प्रा. प्रकाश विठ्ठल सोनवणे | १७३.१७६ |
| ३३ | महात्मा गांधीच्या विश्वस्त संकल्पनेचे विश्लेषण | डॉ. ग्यानदेव उपाडे | १७७.१८२ |
| ३४ | महात्मा गांधी यांची मोक्ष संकल्पना | डॉ. मुबीन शेख | १८३.१८५ |
| ३५ | गांधी तत्वज्ञानातील स्त्री स्वातंत्र्य: एक तात्विक अभ्यास | प्रा. मनोज उत्तमराव पाटील | १८६.१८९ |
| ३६ | पर्यावरणीय नीतिशास्त्र आणि गांधीवादी दृष्टीकोण | प्रा. अनघा पाध्ये—देशमुख | १९०.१९६ |
| ३७ | गांधी ते महात्मा गांधी : गांधीच्या जडणघडणीत ग्रंथाचा प्रभाव | प्रा. डॉ. शीला गोडबोले — पाईकराव | १९८.२०३ |
| ३८ | गांधीजी का ग्राम स्वराज चिन्तन वर्तमान परिप्रेक्ष्य में..... | प्रो. डॉ. लोकेश जैन | २०४.२१८ |
| ३९ | महात्मा गांधींवरील पाश्चात्य विचारवंतांचा प्रभाव: लिओ टॉलस्टॉय, जॉन रस्किन आणि हेन्री डेविड थोरो | डॉ. तानाजी पोळ | २१९.२२३ |
| ४० | हिन्दी नाट्य—साहित्य में अभिव्यक्त गांधीवाद | प्रा. डॉ. प्रकाश कृष्णदेव धुमाल | २२४.२३२ |
| ४१ | गांधीवाद का हिन्दी पद्य (कविता) पर प्रभाव | प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | २३३.२३९ |
| ४२ | गांधी विचारांची विश्वात्मकता | श्री. जयवंत प्रभाकर बोधले | २४०.२४३ |
| ४३ | स्वदेशी : अहिंसक जीवनदृष्टी | प्रा. शितल रुद्रमुनी येरुळे | २४४.२४७ |
| ४४ | महात्मा गाँधी — एक युग पुरुष | प्रो. अंजना विजन | २४८.२५२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ | महात्मा गांधी: लोकशाही हा जीवनमार्ग | ऋतुजा राऊत | २५३.२५७ |
| ४६ | गांधीजींचे पर्यावरणवादी विचार | सोनाली महादेव पवार | २५८.२६७ |
| ४७ | गांधीजी आणि पर्यावरण | मनिषा नागुराव कामजी<br>ऐश्वरी शिवाजी खामकर | २६८.२७१ |
| ४८ | पर्यावरण विचार आणि गांधी | आर्यन एनेश नेरुरकर | २७२.२७८ |
| ४९ | गांधी ते महात्मा गांधींचा प्रवास | तनिका कल्याणकर | २७९.२८४ |
| ५० | गाँधी जी के टिप्पणी और विचार | फिरोज अलिम अली | २८५.२९० |
| ५१ | महात्मा गांधींचे आर्थिक विचार | प्रा. कु. सोनाली सुरेश पेकम | २९१.२९३ |
| ५२ | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार – काळाची गरज | डॉ. बी. एच. दामजी<br>डॉ. ए. व्ही. नामा | २९४.३०० |
| ५३ | महात्मा गांधी यांच्या दृष्टीकोनातून महिला सक्षमीकरण | डॉ. रमिला गायकवाड | ३०१.३०७ |
| ५४ | महात्मा गांधीच्या अहिंसा तत्त्वाची सद्यकालीन प्रासंगिकता | प्रा. धनराज सुभाष हाडुळे | ३०८.३१४ |
| ५५ | महात्मा गांधीजींची धर्म स्वातंत्र्याची संकल्पना | डॉ. बाळासाहेब मुळीक | ३१५.३२३ |
| ५६ | गांधीवाद आणि मराठी कविता | प्रा. विवेक वसंत कुड्डे | ३२४.३२९ |
| ५७ | २१ व्या शतकात 'सर्वोदय' विचारसरणीचे महत्त्व | प्रा. संध्या देवदत्त शिरोडकर | ३३०.३३४ |

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

# मराठी साहित्यातील गांधीवाद

**प्रा. यादव धोंडूजी मोरे**
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय,
पालघर जि. पालघर
मो.नं. ९८९०८२३७६१

## प्रास्ताविक:

इ.स १८१८ ला पेशवाईचा अस्त झाला. आणि भारतीय राजकारणात इंग्रजांचा उदय झाला. भारतीय राजकारणाची सत्तासूत्रे इंग्रजांनी आपल्या ताब्यात घेतली. व देशाचा राज्यकारभार सुरू झाला.?

इ.स १९२० ला टिळकांचा अस्त झाला. आणि भारतीय राजकारणाची सत्तासूत्रे गांधीजींनी आपल्या ताब्यात घेतली. व राज्यकारभार सुरू झाला.

भारतीय राजकारणावर गांधीजींच्या विचारांचा खोलवर परिणाम झाला आहे. कारण गांधीजींनी आपल्या नव्या मंत्राने ग्रामीण भागातील व शहरी भागातील नागरिकांना एक करण्यासाठी 'खेड्याकडे चला' अशी हाक दिली. त्यातूनच नवीन विचारसरणी उदयास आली.

मराठी साहित्यात विविध असे साहित्य प्रकार उदयास आले. त्यात प्रामुख्याने मराठी कथा वाङ्.मय प्रकार या दृष्टीने गांधीजीच्या विचाराचा प्रचार व प्रसार करण्यासाठी लेखकांनी आपले योगदान दिले आहे.

## १. गांधीवादाचा कथेवर झालेला परिणाम:

दुसरे महायुद्ध व स्वातंत्र्यानंतर औद्योगिकीकरणाची चाललेली प्रकिया, त्यातून निर्माण झालेली यंत्रसंस्कृती आणि तिच्यातून निर्माण झालेले तीव्र सामाजिक, आर्थिक महानगराची प्रक्रिया त्यातून निर्माण झालेले ताणतणाव, मानवाला आलेले एकाकीपण, अंधश्रध्दा, परात्मतेची जाणीव मराठी कथेने तीव्रपणे साहित्यात आणली. रंगनाथ पठारे सारख्या उमद्या लेखकांनी गांधीजींच्या जीवनावर लिहावे, एवढे सोपे नाही परंतू? लेखकांनी आपल्या अभ्यासपूर्णतेतून गांधीजींना साहित्यात आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. उदा. 'गांधीजी अकरा सप्टेंबर २००१' ही कथा बघण्यासारखी आहे.

**Akshar Wangmay(International Research Journal)**
**UGC CARE Journal**
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
**National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context**
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

गांधीजींची विचारधारा ही साधीसुधी होती. गांधीजींना जन्मापासून ते शेवटपर्यंत मी त्यांना बघितले होते. गांधीजींचे हडकूळे शरीर, पंचा, टक्कल, काठी, वैष्णव जन तो तेणे कहिए! असे गांधी पठारे यांना भावले होते. गांधीजीला नथूराम गोडसेंनी जरी मारले तरी त्यांच्यातील विचारधारा हे राम किंवा येशु ख्रिस्तासारखे ईश्वर त्यांना क्षमा करो. आपण काय करत आहोत हे त्यांना कसे समजत नाही.

## २. गांधीजींच्या जीवनाचे विविध पैलू:

'गांधीजी अकरा सप्टेंबर २००१' या कथेतून रंगनाथ पठारे यांनी गांधीजींच्या जीवनातील 'सत्य आणि अहिंसा' ही दोन मुलभूत तत्वे त्यांनी जन्मभर घट्ट धरुन ठेवली होती. बाकी सर्व बाबतील कालमानानुसर यथोचित बदल करण्याची त्यांची तयारी होती. असे चित्रण केले आहे.

ज्याप्रमाणे अमेरिकेवर हल्ला झाला. त्यावेळेस किमान पाच हजार माणसे मेली असतील. त्यामुळे या दुनियेचे काय होणार? अशी भीती सुध्दा निर्माण झाली होती. या दुनियेला झालं तरी काय कोणाला अंताची वाट पाहत बसले असतील. गांधीजी असते तर त्यांनी काही सांगितल असतं. त्यामुळे गांधीजींची गरज असेल तर त्यांना कायम ठेवा किंवा वाटत नसेल तर त्यांना मनातून बाहेर काढा आणि जा सामोरे असे या कथेतून व्यक्त केले आहे.

## ३. गांधीजींच्या विचारांचा प्रभाव:

गांधीजींच्या विचारांचा प्रभाव जसा कथेवर झाला त्याचप्रमाणे कवितेवर सुद्धा त्यांच्या विचारांचा प्रभाव पडलेला आहे. उदा. कुसुमाग्रज यांची 'अखेर कमाई' ही कविता 'प्रवासीपक्षी' या काव्यसंग्रहातून घेतली असून या कवितेत पाच पुतळे एकमेकांजवळ येऊन आपल्या भावना व्यक्त करताना दिसतात. प्रत्येकांना आपआपली जात, धर्म, पंथ आहे. मला मात्र सरकारी भिंतीवर अडकवलेले असते अशा प्रकारची आर्त हाक गांधीजींनी या कवितेतून दिली आहे.

कुसुमाग्रजांनी 'अखेर कमाईचे' चिज काय झाले? यांचे ज्वलंत उदाहरण म्हणजे ही कविता होय.

मराठी साहित्यात गांधीवादाच्या प्रभावळीमुळे कथा, कविता, हे वाङ्‌मय प्रकार उदयास आले होते. कुसुमाग्रजांनी गांधीजींच्या विचाराला आत्मसात करण्याचा प्रयत्न या कवितेतून केला आहे. (प्रवासी पक्षी : शंकर वैद्य)

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

## ४. गांधीजींच्या विचारांचा अनेकांवर पडलेला प्रभाव:

गांधीजींच्या विचारांचा प्रभाव कवितेनंतर कादंबरी वाङ्.मयावर सुध्दा झाला होता. याचे द्योतक म्हणून व्यंकटेश माडगूळकर यांची 'वावटळ' ही कादंबरी होय. ३० जानेवारी १९४८ रोजी सायंकाळी प्रार्थनेच्या जागी आल्यानंतर आशाबेन आणि मनू या नातींच्या खांद्यावर दोन्ही हात टाकून हळूहळू ते चालले होते. जमलेल्या दुतर्फा गर्दीतून व्यासपीठाकडे जाताना लोकांचे नमस्कार स्वीकारण्यासाठी त्यांनी नातीचा हात सोडला. आणि दोन्ही हात जमावाला जोडले. एवढ्यत गर्दीतून नथुराम गोडसे यांनी उभे राहून पिस्तूलाने लागोपाठ तीन गोळ्या गांधीजींवर झाडल्या. 'हे राम' उद्गार काढून गांधीजी धरणीवर पडले.

अशा प्रकारचे चित्रण व्यक्त करणारी कादंबरी म्हणून 'वावटळ' या कादंबरीचा आढावा घेता येईल. गांधीजींच्या हत्येमुळे पुण्यात कर्फ्यू लावल्यामुळे कॉलेजला शिकणाऱ्या मुलांची काय अवस्था झाली होती याचे विदारक चित्रण यातून केले आहे.

कादंबरीतला नायक यशवंता, गोपू आणि इतर कॉलेजच्या मुलांची काय अवस्था झाली होती. अशा वेळी यशवंता व त्यांची मित्रमंडळी गावाकडे निघालेली होती. त्याचे
मोटार कऱ्हाडपर्यंत कशी येऊन पोहोचली. पुण्यात अठ्ठेचाळीस तास कर्फ्यू लागल्यामुळे खोलीच्या बाहेर पडता सुध्दा येईना. जेवण मिळेना. त्यामुळे मी गावाकडे जाऊन येऊ. कारण विदारक दर्शन यातून व्यक्त केले आहे.

नांदवडीकडे निघालेली गांधाजींच्या हत्येचा लोकांच्या मनावर परिणाम झाला आहे. काही लोक तर बातमी ऐकताच बेशुद्ध झाले होते.

गांधीजींची हत्या झाल्यामुळे पुण्यात ब्राम्हणांची घरे कशी जाळली गेली. चोहीकडे या घटनेचे पडसाद कसे उमटले. पूर्ण महाराष्ट्रावर याचे बरे–वाईट परिणाम काय झाले. याचे चित्रण व्यंकटेश माडगूळकर यांनी नांदवडी, पुणे, मुंबई, कऱ्हाड अशा अनेक ठिकाणांचे चित्रण यातून केले आहे.

पुण्यात गांधीजींच्या हत्येमुळे लुटालूट कशी सुरू झाली. फौजदाराने पिस्तुलाने गोळ्या कशा झाडल्या मग मात्र लोक इकडे–तिकडे कशी पळू लागली. गांधीजींच्या नावाचा जयघोष कसा केला गेला. पळता पळता 'खून के बदले खून' अशी घोषणा केली. आणि एखाद्या 'वावटळीसारखी' ती झुंड निघून गेली असे प्रसंग यातून बघायला मिळतात. माडगुळकरांनी 'वावटळ' मध्ये गांधीवधानंतरच्या ग्रामीण धगधगीचे वेगळेच दर्शन घडविले आहे.

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

इ.स १९२० नंतर महात्मा गांधीजींच्या सविनय कायदेभंग, दांडी यात्रा या सारख्या राजकीय मोहिमा पर्यंतचा काळ कादंबरीत चित्रित झाला आहे. मराठीमध्ये महात्मा गांधीवादाचे परिणाम त्यांच्या राजकीय खेळीची पुसटती जाण वि.स खांडेकरांच्या कादंबऱ्यांमध्ये दिसते.

## ५. स्त्रीवादी लेखिकांवर गांधीवादाचा पडलेला प्रभाव:

मृणालिनी देसाई यांच्या 'पुत्र मानवाचा' (१९६९) या कादंबरीत गांधीजीच्या जीवनाचे आदर्शवादी दृष्टिकोनातून चित्रण करण्यात आले आहे. दक्षिण आफ्रिकेतून गांधीजी येतात. इथपासून ते एका माथेफिरूने त्यांचा खुन करेपर्यंतचा कालखंड या कादंबरीत आला आहे. गांधीजी मधला माणूस, संत आणि राजकारणी या विविध दर्शनाचे एकसंघ चित्रण करण्याचा प्रयत्न आहे.

गांधीजींना जे अभिप्रेत होते ते का घडले? नसते घडले तर त्यांचा दोष नेमका कोणाला द्यायचा? आणि कशाला द्यायचा? महाकाव्याला शोभेल असा हा विषय मृणालिनी देसाईंनी प्रथम पासूनच श्रध्देचा आधार घेतल्याने नेमक्या प्रश्नांच्या अनुरोधाने गांधीजींच्या जीवनाचा वेध घेण्याऐवजी त्यांच्या जीवनाची भक्तिगाथा सादर करण्यातच लेखिकेने धन्यता मानली आहे. (संदर्भ– प्रदक्षिणा खंड २ पृष्ठ क्र २०५)

## ६.मराठी नाटकावर गांधीवादाचा पडलेला प्रभाव:

'मी नथुराम गोडसे बोलतोय', गांधीविरुद्ध गांधी, गांधीविरुद्ध आंबेडकर ही नाटके गांधीजींच्या जीवनावर आधारलेली आहे.

## ७. गांधीवादाचा राजकारणावर पडलेला प्रभाव:

टिळक युगाचा अस्त झाल्यानंतर भारतीय राजकारणात गांधीजींच्या विचाराचा उदय झाला. ही एक घटना महत्त्वाची मानली जाते. १४ ऑगस्ट १९४७ ला भारत पाकिस्तान या दोन्ही देशाची फाळणी कशी झाली? १४ ऑगस्ट १९४७ ला पाकिस्तान भारतातून वेगळा झाला. व १५ ऑगस्ट १९४७ ला भारत हा एक अखंड देश म्हणून उदयास आला. याची संपूर्ण जबाबदारी गांधीजींनी आपल्या खांद्यावर घेतली होती. असे प्रा. नरहर कुरुंदकर यांनी 'अन्वय' या वैचारिक ग्रंथात म्हटले आहे.

## ८.महाराष्ट्रातील विचारवंतावर गांधीजींचा पडलेला प्रभाव:

महात्मा गांधीजींच्या विचारांचा प्रभाव अनेकांवर पडलेला आहे. त्यात प्रामुख्याने प्रा. नरहर कुरुंदकर, प्रा.ग.बा. सरदार, साने गुरुजी, बाबा आमटे अशा विचारवंतावर त्यांचा खोलवर परिणाम झाला होता असे म्हणता येईल. एवढेच नव्हे तर खान अब्दुल गफार खान उर्फे 'सरहद्द गांधी' किंवा

Akshar Wangmay(International Research Journal)
UGC CARE Journal
ISSN: 2229-4929 RNI MAHMAR 36829-2010
National Conference on Rethinking Mahatma Gandhi in Present Context
Organized by: Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College Palghar, Maharashtra, India
Held on 29th February 2020

'बादशाह' या नावाने त्यांना ओळखले जायचे. म्हणजे गांधीवादाचा या विचारवंतावर खोलवर प्रभाव पडलेला होता असे म्हणता येईल.

रविंद्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम गांधीजींना 'महात्मा' ही उपाधी दिली. 'महात्मा' या शब्दाचा संस्कृतमध्ये अर्थ आहे 'महान आत्मा'. भारतातील लोक त्यांना प्रेमाने 'बापू' म्हणत असत. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी इ.स १९४४ मध्ये त्यांना 'राष्ट्रपिता' असे संबोधल होते. कारण ते सत्याग्रहाचे जनक होते. त्यांना स्वतंत्र भारताचे 'राष्ट्रपिता' मानले जाते. इ.स १३ एप्रिल १९२१ रोजी अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील मोठा कलंक आहे.? धर्मश्रध्दा ही गांधीजींच्या विचारसरणील मोठी प्रेरक शक्ती होती. यावरुन खालील निष्कर्ष काढण्यात आले आहे.

१. भारतीय राजकारणाची सत्तासूत्रे गांधीजींनी ताब्यात घेतली आहे. याचा विचार केलेला आहे.
२.मराठी साहित्यावर गांधीवादाचा प्रभाव कसा पडला त्याचा अभ्यास केलेला आहे.
३.दुसरे महायुद्ध व स्वातंर्त्याची चाललेली प्रक्रिया यातून कशी दिसते याचे चित्रण केलेले आहे.
४.कथा वाड्.मयात गांधीवादाचा पडलेला प्रभाव याचा विचार केलेला आहे.
५.कविता वाड्.मयात गांधीवादाचा पडलेला प्रभाव याचे चित्रण कुसुमाग्रजांच्या कवितेत कसे केले आहे. याचा अभ्यास केलेलाआहे.
६. 'वावटळ' कादंबरीतून ग्रामीण भागतील व शहरी भागातील गांधीजींच्या हत्येचे चित्रण विद्यार्थ्याच्या माध्यमातून कसे केलेआहे याचा अभ्यास केला आहे. व 'पुत्र मानवाचा' या मृणलिनी देसाई यांच्या कादंबरीचा अभ्यास केलेला आहे.
७. गांधीवादाचा विचारवंतावर पडलेल्या प्रभावाचे चित्रण देशाच्या फाळणीतून कसे केले आहे. याचा अभ्यास महत्वाचा वाटतो.
८. भारतीय राजकारणात गांधीवादाने निर्माण केलेलेवादळ याचा अभ्यास महत्वाचा वाटतो?
९. भारतीय विचारवंतावर गांधीजींच्या विचारांच्या प्रभावाचे चित्रण कसे केले आहे याचा अभ्यास महत्वाचा वाटतो.

## संदर्भ ग्रंथ यादी व सूची :

१. कथाविविधा प. आवृत्ती जून २००९शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर
२. गांधी आणि आंबेडकर , गं.बा. सरदारसंपादक, उषा वाघ सदाशिव पेठ पुणे
३.वावटळ , व्यंकटेश माडगूळकरउत्कर्ष प्रकाशन, सौ. सविता जोशी पुणे ४
४.अन्वय, प्रा. नरहर कुरुंदकर
५.प्रवासी पक्षी , शंकर वैद्य